ISSN–2278-5655

Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XII, Issue– VI (Special Issue-I) Nov – Dec, 2023

OPEN ACCESS Original Research Article

# समाजजीवनावरील माध्यमांचा व तंत्रज्ञानाचा परिणाम

* प्रा. उन्नती संजय चौधरी

*संशोधक विद्यार्थी, कबचौ उमवि, जळगांव. ** सहायक प्राध्यापक, आर. सी. पटेल शिक्षणशास्त्र महाविद्यालय, शिरपूर जि.धुळे.

गेल्या काही दशकापासून व्हाट्सअप, फेसबुक, इंस्टाग्राम ट्यूटर यासारख्या समाजमाध्यमानी स्त्रीपुरुष मग ते कोणत्याही वयाचे, कोणीही असो, अल्पवयीन किंवा प्रौढ, विवाहित, अविवाहित, पतीपत्नी, मित्रमैत्रीण, वर्गमित्र, सहकारी, परिचित, स्नेही, आप्तेष्ट वगैरे यांचे जीवनविश्व व्यापून टाकलेले आहे. समाजमाध्यमातून एकमेकांच्या संपर्कात असतांना स्त्री आणि पुरूष यांच्या भावजीवनावर अनुकूल व प्रतिकूल जे काही परिणाम झाले व होत आहेत, त्याविषयी समाजमाध्यमावरच बरीच चर्चा झालेली आहे. स्त्री पुरूष प्रतिमा किंवा संबंध या अनुषंगाने ससंदर्भ चिंतन येथे करता येईल.

**Copyright © 2023 The Author(s):** This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial use provided the original author and source are credited.

तंत्रज्ञानाचा विकास होतो आहे. समाजमाध्यमांचे वेगवेगळे व्हर्जन विकसित होत आहे. याआधी माणसं टेलिफोन, पत्रलेखन, फॅक्स वगैरे माध्यमातून परिचित, जवळची माणसं जोडलेली असायची आता तर परिचित, अपरिचित, नात्यातील, नात्याबाहेरील असे कोणीही कोणाशी जोडले जात आहे. यात मुलंमुलं आणि स्त्री पुरूष यांचा समावेश जास्त आहे. त्यात भिन्नलिंगी आकर्षणाचा भाग अधिक आहे. हा समाजमाध्यमांचा परिणाम आहे. दुसरी गोष्ट म्हणजे माणूस माणसाजवळ असूनही तो या माध्यमांमध्ये इतका गुंतलेला आहे की सोबतच्या जोडीदाराचाही त्याला विसर पडतो. विशेष म्हणजे पती पत्नी संदर्भात असे अनुमान आहे की, "हैरानी होगी आपको, सात जन्म तक साथ निभाने वाले पति-पत्नी के बीच में मोबाइल अब विवाद का बड़ा कारण बनता जा रहा है। मोबाइल में पासवर्ड लगाने का मामला हो या किसी से बात करने का, मोबाइल पर चैटिंग हो या रील्स देखने पर टोकाटाकी और मारपीट के मामले लगातार नारी उत्थान केंद्र पर आ रहे हैं। मनोवैज्ञानिकों का दावा है कि जब भी आप किसी अपने से कुछ छिपाने की कोशिश करते हैं तो उसके दिमाग में बहुत बुरा असर पड़ता है, जिसके कारण आपसी मतभेद के मामले बढ़ते हैं।देखा जाये तो पिछले कुछ समय से मोबाइल ने लोगो के बीच की दूरिया कम की है तो वही एक घर मे रह रहे पति-पत्नी के बीच दूरिया बढ़ा दी है। जिससे पति पत्नी के बीच तनाव बढ़ता ही जा रहा है कभी कभी विवाद इतना बढ जाता है कि पति को लगता है कि उसकी पत्नी अत्यधिक मोबाइल का इस्तेमाल करती है तो वही पत्नी को लगता है कि अत्यधिक मोबाइल का इस्तेमाल करने पर पति अन्य किसी महिला से बात करता है जिससे दोनों के बीच विवाद होता है और मामला परिवार परामश केंद्र तक

ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XII, Issue– VI (Special Issue-I) Nov – Dec, 2023

OPEN ACCESS Original Research Article

पहुँच जाते है, जिन्हें कांउसिलिंग के दौरान सुलझाया जाता है। इसी तरह से कई और कारण है जैसे नशा करने, खर्चा न देने, प्रेम विवाह मे किसी एक बात पर सहमति होने को लेकर, पत्नी का घरेलू कार्य न करना, पति के साथ परिवार से अलग रहना आदि। जो पति-पत्नी के रिश्ते में तकरार पैदा कर रहा है।"१

समाजमाध्यमांमुळे व्यक्तीचे परस्परांशी संपर्क येणे, त्यांच्यात वैचारिक, भावनिक देवाणघेवाण आणि इतर व्यावहारिक कामे होणे सोपे झाले आहे, परंतु आपला जोडीदार विशेषतः पती पत्नी  हे जेव्हा एकाच जागी बसून तर कधी दूर अंतरावर राहून या माध्यमांचा वापर करतात, तेव्हा ते काय काय करतात हे एकमेकांना दिसत नाही. त्याबाबत खुलेपणाने चर्चाही करत नाही, म्हणून त्यांच्यात संशय उत्पन्न होतो. त्यात परस्परांच्या मनात व्यभिचाराची  शंका निर्माण होते. त्यामुळे भांडण होतात. याचे प्रमाण शतप्रतिशत नाही, परंतु लक्षवेधी जरूर आहे.बुधवार दिनांक २२  नोव्हेंबर २०२३ च्या लोकमतमधील बातमीच्या लीडमध्ये लिहिले आहे की, " ती मित्रासोबत सतत चॅटिंग करीत असल्याने तो तिच्या चारित्र्यावर संशय घ्यायचा. यातून त्याने हत्या केल्याची माहिती समोर आली."२

या बातमीतील तरुण आणि तरुणी लॉकडाऊनच्या काळात ओळख झाली. नंतर त्याचे प्रेमात रूपांतर झाले. ते लिव्ह इन रिलेशनशिपमध्ये राहत होते. मात्र चारित्र्याच्या  संशयावरून त्यांच्यात भांडणं होत. त्याचा परिणाम तिची हत्या त्याने केली,म्हणजेच मुलीच्या जीवाला अधिक धोका असतो,हे अशा अनेक घटनांवरुन लक्षात येते. तसेच त्यांच्यात किंवा कुटुंबात एक सुसंवाद हवा, एकत्र येणं, गप्पा मारणं, भावना, मन मोकळं करणं हे न घडता दुरावा निर्माण होतो. एकाच घरात असूनही प्रत्येक जण एकटा पडलेला दिसतो. आपल्या माणसांसोबत असण्यापेक्षा दूरच्या  माणसांना संपर्क करतो, म्हणून "सोशल मीडिया एक दूसरे के काम को जानने और मन की खिड़कियों पर दस्तक देने का एक अच्छा टूल जरूर है, लेकिन वह केवल टूल है, जिंदगी नहीं है. उसका टूल की तरह ही उपयोग होना चाहिए, लेकिन यदि उसे असल जिंदगी के विकल्प की तरह समझ लिया जाएगा तो तकलीफ हमें ही होगी, क्योंकि उससे अकेलापन निरंतर बढ़ता जाएगा और अंत में समाज एक नए अवसाद का शिकार होगा."३

समाजमाध्यमांचा अतिरिक्त वापर करतांना शारीरिक थकवा येऊन त्याचे आरोग्यावर परिणाम तर होतातच, परंतु जवळच्या रक्तसंबंधातील नात्यांमध्ये भावनिक दुरावा निर्माण होत जातो. आपल्या रोजची कामे, जबाबदाऱ्या व एकमेकांप्रती असलेल्या कर्तव्याचा विसर पडतो. त्यामुळेही कौटुंबिक वातावरण बिघडत जाते. मुलांच्या काळजीचा व संगोपणाचाही प्रश्न निर्माण झालेला दिसतो. पती आणि पत्नी यांच्यातील जवळीक, प्रेम आणि आकर्षण कमी  होत गेले. कारण सतत फोनवर बोलत राहणे, समाजमाध्यम जसे- फेसबुक, युट्यूब, व्हाट्सॲप, इंस्ट्राग्रामवर चॅटींग करणे, फोटो अपलोड करणे, मनोरंजन करणे यात गुंतून राहिल्याने कोणाचे लक्ष कोणाकडे जात नाही. एका घरात राहूनही बऱ्याचदा एकमेकांविषयीचे विचार त्यांच्या मनात येत नाही. त्यांच्या परस्परांकडून हव्या असलेल्या गरजांची पूर्तता होण्यास अडथळे येतात व त्यांच्यात संघर्ष उदभवतात. त्याचा मर्यादित स्वरूपात वापर करून त्याचे फायदे लक्षात घ्यायला हवे,तर जागतिकीकरणात विश्व हे कुटुंब बनल्याने अनेक परिचित अपरिचित माणसं एकमेकांशी जोडले जातात, पण त्यांच्यात

ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XII, Issue– VI (Special Issue-I) Nov – Dec, 2023

OPEN ACCESS Original Research Article

गुंतून जाणे योग्य नाही. एक समतोल साधून समाजमाध्यमाकडे पाहिले पाहिजे. कारण "सोशल मीडिया पर दिखावा अधिक है, मगर वहां आसानी से दोस्ती हो जाती है। इसलिए सोशल मीडिया फ्रेंड की संख्या वास्तविक मित्रों से अधिक होती है। बरेली कॉलेज में मनोविज्ञान विभाग की एसोसिएट प्रोफेसर डॉ. .हेमा खन्ना बताती हैं सोशल मीडिया पर की गई मित्रता से निश्चित रूप से कुछ स्तर की दोस्ती और जुड़ाव प्राप्त हो सकता है, लेकिन वे वास्तविक जीवन के दोस्तों का पूर्ण विकल्प नहीं हो सकते। सोशल मीडिया बिछड़े दोस्तों से मिलवाने एवं परिचय के लिए मदद कर सकता है, लेकिन लंबे समय तक जुड़ाव महसूस करने में यह असफल होगा। असली दोस्ती, विश्वास और गहरे जुड़ाव पर आधारित होती है, जबकि सोशल मीडिया फ्रेंड्स समर्थन और एक संबंध का अहसास देते हैं। वे आपको इतने गहरे रूप से नहीं जानते।"४

समाजमाध्यमाची अशाप्रकारची चांगली उपयुक्तता ध्यान्यात न घेता आभासी विश्वात स्त्री-पुरूष रमून जातात. परिणामी आपल्या सहजीवनात व कौटुंबिक जीवनात अंतर पडत जाते. आपण आपल्याच तालात राहून वेळ घालवण्याचा आनंद मिळवत असतांना त्यांच्यातील संवाद कमी होतो. हातातील हे माध्यम सोडून एकमेकांची कामं टाळायचे व फोनवरही बोलत राहण्याचे प्रमाण वाढत गेले. त्यामुळे पती-पत्नी यांच्यात अधिक रूसवे, फुगवे, मतभेद, वादविवाद निर्माण झालेले दिसतात. त्याचा शेवट केवळ परस्परांशी प्रेमभाव कमी होत नाही, तर घटस्फोटाचे प्रमाणही वाढत आहे. सतत सोबत राहताना तेच ते दैनंदिन जीवन जसे त्यांना कंटाळवाणे वाटते. एकमेकांना समजून घेऊन परस्परांमध्ये गुंतून जात नाहीत. मग त्यांच्यात आलेले एकाकीपण घालवण्यासाठी ते समाजमाध्यमाद्वारे जोडल्या गेलेल्या मित्रांच्या घोळक्यात स्वतःची प्रतिमा उजळ करण्याचे केविलवाणे प्रयत्न करतात. त्यातून त्यांना फार काही साध्य होत नाही. न्यूज 18 हिन्दी यांच्या ब्लॉंगवरील लेखात राकेशकुमार मालवीय यांनी लिहिले आहे की, "सोचिये कि आभासी दुनिया का क्या असर असल जिंदगी पर पडा हैं? हम कह सकते है कि फेसबुक पर हमारे पांच हजार दोस्त है, और नए बनाए नहीं जा सकते, टिवटर पर तो खैर फॉंलोअर होते है, लेकिन ऐसे कई मंच है, जहाँ पर कि हम अपने दोस्तों की संख्या के मामले में खुद को बडा बता सकते है, पर इनमें से कितने हैं, जिन्हे सही-सही पता होता है कि आपकी जिंदगी में चल क्या रहा हैं? फिर दोस्तों की इतनी भीड में क्यों अकेलेपन से लोग परेशान है, मौत को गले लगा रहे है, फिर एक-दुसरे की दुख-तकलीफ और खुशियों में भी वह खडे दिखाई नहीं देते हैं।" ५

भारतीय स्त्रीपुरूषांचे जीवन विवाहसंस्था, कुटुंबव्यवस्था व त्यातून निर्माण झालेले आप्तसंबंध, नातेवाईकांचा गोतावळा यांनी व्यापून राहिलेले आहे. व्यक्ती त्यात अडकून पडलेला आहे. त्यातून बाहेर पडण्यासाठी त्याला मित्रत्वाचे भावसंबध अधिक समाधानकारक वाटतात; परंतु त्यातून खरे सुख व समाधान मिळतेच असे नाही. समाजमाध्यमांवर जुळलेल्या ओळखी, अनोळखीच्या मैत्रीची चर्चा खूप होत आहे. एकमेकांशी चॅट शेअर करणं, फोटो, व्हीडिओ व संदेश पाठवणं या कार्यात व्यक्ती गुंतून पडलेले आहे. त्यात स्वतःला चांगले प्रकट करून आपले गुण, यश, आनंद सांगून समोरच्यांकडून स्मुतीसुमनांची व प्रेमभावनांची अपेक्षा केली जाते. सुखाच्या वेळी शुभेच्छाचा वर्षाव आणि दुःखाच्या वेळी शोक संदेश पाठवून स्वतःमधील माणूसकी, प्रेमाचे दर्शन

ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XII, Issue– VI (Special Issue-I) Nov – Dec, 2023

OPEN ACCESS Original Research Article

घडविले जाते, पण यात त्यांच्यातील आंतरिक जिव्हाळा असतोच असे नाही, कारण हीच माणसे आपल्या माणसांच्या सुख-दुःखात सहभागी व्हायला वेळ काढत नाहीत, नेहमीच्या आपल्या माणसांच्या भेटीगाठी संपर्क यातून सनातन समूहमूल्य जोपासण्याची भावना किंवा विचार त्यांच्या ठिकाणी फारसे नाहीत. गेल्या काही दशकापासून ते कमी होत गेले. माणूस साऱ्या गोतावळ्यात असूनही एकटेपण अनुभवतो आणि समाजमाध्यमाचा व्यापार करणाऱ्याच्या जाळ्यात अडकतो. या मिडीयाचा खरा वापर तर काही कंपन्या व लोक पैसे मिळविण्यासाठी करतात. त्यांचे व्यवसाय, कामकाज सुकर होण्यासाठी त्याचा योग्य वापर करून स्वत:चे जीवनमान उंचवण्याचे प्रयत्न करतात. जसे "सोशल नेटवर्क सेवेमुळे एकाच वेळी अनेक लोकांशी संपर्क व ओळख ठेवता येते. ह्यात वेळ, स्थान इत्यादी गोष्टी आड येत नाही. मात्र ह्या ओळखींचा प्रत्यक्ष आयुष्यात उपयोग होतो की नाही हे सांगणे कठीण आहे. सोशल नेटवर्किंग संकेतस्थळांवरील माहितीचा वापर अनेक कंपन्या, अर्थवित्तीय संस्था, मोबाईल सेवा पुरवणाऱ्या कंपन्या इत्यादी करतात. अनेक वेळा ह्या माहितीचा गैरवापरही केला जाऊ शकतो. सोशल नेटवर्किंग संकेतस्थळांचे वाढते जाळे व लोकप्रियता तसेच लोकांवर होणारा परिणाम हे अनेक अभ्यासकांचे लक्ष वेधत आहेत. ह्या वाढत्या लोकप्रियतेबरोबरच इंटनेट व सोशल नेटवर्किंग संकेतस्थळांचे व्यसनही वाढत आहे." ६

आर्थिक हित साध्य करण्यासाठी अनेकांनी त्यांची संकेतस्थळे, ॲप बनविलेले आहे. लहानमुलांसह स्त्रीपुरूषांना त्याची सवय होऊन ते अकारण बळी जात आहेत. या माध्यमाचे वापरकर्ते कसे आहेत, त्यांची आवडनिवड, मानसिकता याचा अभ्यास करून त्यांना हव्याहव्याशा गोष्टी त्यांच्यासमोर एका क्लीकवर हजर केल्या जातात. लाखो-करोडो बाबींमधून हे वापरकर्ते आपल्या आवडीनिवडी तेथे जोपासतात आणि त्यात अडकून पडतात, तेव्हा त्यांना कशाचेच भान राहत नाही. समाजमाध्यमाद्वारे ऑनलाईन मैत्री करणे त्यांना फार आवडते. अशा मित्रांकडे ते आपल्या खाजगी गोष्टी प्रकट करतात. त्यांच्या जीवनातील गुप्तराज एकमेकांना कळविले जाते. सुख-दुःख सांगितले जाते. आत्मीय सहानुभूती व आत्मीयता मिळविली जाते. त्या माध्यमांचा उपयोग करण्यासंबंधी पलक राठी यांनी सांगितले आहे की, "केवल तभ लोगोसे जुड़े जब आपको किसी सहायता की आवश्यकता हो या किसी काम पर चर्चा की जानी हो, बल्कि समय-समयपर उनसे बात करते रहे, उनकी जांच करे, उनकी सराहना करे, शायद किसी कहानी पर प्रतिक्रिया देकर या उनकी छोटी जीत का जश्न मनाए। उन्हे एक प्यारासा संदेश भेजना या उन्हे बधाई देने के लिए फोन करना। ऑनलाईन जुडे रहना बहुत अच्छा है, जब भी और जहां भी संभव हो उनसे व्यक्तिगत रूपसे मिलने का प्रयास करे। वास्तविक मित्रता देखे और बनाए!" ७

ऑनलाईन मैत्रीमध्ये खरेपणा, विश्वासार्हता असण्याबाबत मात्र शंका घेतली जाते. वास्तविक जीवनात त्या मैत्रीत दृढता कमी आणि संधीसाधूपणा त्यांच्या मनात अधिक दडलेला दिसतो. यात स्त्रियानी पैशांसाठी पुरूषांना आपल्या जाळ्यात अडकवल्याच्या घटनाही घडलेल्या आहेत आणि पुरूष किंवा तरूणांनी अशा मैत्रीचा गैरफायदा घेऊन स्त्रियांचे, तरूणींचे शोषण केले असल्याचा घटनाही समोर आलेल्या

ISSN–2278-5655

Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XII, Issue– VI (Special Issue-I) Nov – Dec, 2023

OPEN ACCESS

Original Research Article

आहेत. अशावेळी ऑनलाईन मैत्री निर्माण झाल्यानंतर प्रत्यक्ष भेटून परस्परांना पूर्णपणे ओळखून घेणे व मैत्रीबाबत सातत्य राखणे हे सूज्ञ वापरकर्त्यांचे काम असते.

स्त्री-पुरूष, तरूण-तरूणी समाजमाध्यमावर जुळतात. तेव्हा त्यांच्यात प्रेम, प्रणय आणि भिन्नीलिंगी आकर्षणामुळे प्रकट होणारे लैंगिक भाव याचे प्रमाण अधिक असते. मग ते एकमेकांशी जुळलेले कोणीही असो, परिचित, मित्र, अनोळखी व्यक्ती, दूरचे नातेवाईक, शेजारपाजारचे असे कोणीही असले तरी त्यांच्या अंतिम चर्चेचा, संपर्क साधण्याचा शेवट हा 'प्रेमलीला' यात होतो; म्हणून मुलामुलींचे पळून जाऊन लग्न करण्याचे प्रमाणही वाढत गेल्याच्या बातम्या वृत्तपत्रात झळकताना दिसतात, तर कधी अशा तरूणींच्या जीवाला धोका झाल्याचे, फसविले गेल्याचे वृत्तही पाहायला मिळतात. अशावेळी सरकारने 'सायबर क्राईम' विषयक कायदेदेखील केलेले आहे. जसे - "वापरकर्त्यांसाठी खुली, सुरक्षित आणि विश्वासार्ह तसेच उत्तरदायी इंटरनेट सेवा सुनिश्चित करणे हे सरकारच्या धोरणांचे उद्दिष्ट आहे . इंटरनेटच्या विस्तारामुळे आणि अधिकाधिक भारतीय ऑनलाइन येत असल्यामुळे, इंटरनेटवर बीभत्स आणि अश्लील सामग्रीच्या जाळ्यात ते अडकले जाण्याची शक्यता वाढली आहे .सायबरस्पेस सुरक्षित करण्यातील अनेक आव्हानेही इंटरनेटचा प्रचंड विस्तार आणि सीमाविरहित असण्याच्या स्वरूपातून समोर येत आहेत." ८

स्त्री पुरूषांना ज्या गोष्टी खाजगी जीवनात व्यक्त करता येत नाही, कुटुंब समाजाचे बंधने येऊन पडतात. अशावेळी लैंगिक भावना प्रकट करण्यासाठी काहींना हे माध्यम सोपे वाटते. त्यांच्या भावना व विचारांमध्ये प्रामाणिकपणा व नैतिकता फार कमी असते. मर्यादा ओलांडून ते नैसर्गिक भाव प्रकट करणारे संदेश शेअर करतात. एकमेकांना प्रतिसाद देऊन समाधान मानतात, पण एखाद्याला आपल्याशी जुळलेल्या व्यक्तीचे हेतू लक्षात येत नाही किंवा आले तरी त्यापासून दूर होणे अवघड जाते. कारण त्यांची ब्लॅकमेल करण्याची भीती वाढत जाते आणि नको असताना तो ताण सहन करावा लागतो. यात स्त्रियांची, तरूणींची फार कोंडी होते. प्रामाणिक मैत्री आणि चांगली चर्चा होण्याचे प्रमाण किती असेल? याबाबत अनेकांना शंका उपस्थित होते. म्हणून व्हाट्सअप वापरकर्त्या स्त्री-पुरूषांना घरातून, कुटुंबातून विचारणा केली जाते. रागवले किंवा बोलले जाते. त्याआधीच कोणी पाहू नये, आपले मेसेज चेक करू नये म्हणून पासवर्ड ठेवले जातात. म्हणजे चोरी तर लपवली जातेच. आपण आपल्या माणसांसोबत असूनही त्याच्यापासून दूर होत राहतो. जसे "आज, चार-चौघाचा कट्टा जमतो,चौकाचौकात तरुण जमतात मात्र संवाद होत नाही. जो होतो तो आपल्याच मोबाईलमध्ये चार-चौघात बसूनसुध्दा काही न काही काड्या करत बसलेला असतो. शरीराने जवळ असतात. मात्र सर्व लक्ष त्या मोबाईलमध्ये असतं. हल्लीच्या तरुणांची नाळ मात्र इंटरनेटशी जुळलेली असेल म्हणूनच कदाचित सोशल मीडियाचा इतका जबरदस्त प्रभाव त्याच्यावर आहे की ते मोबाईलाच आपलं जग मानून त्याच खोट्या विश्वात रमत चाललेला आहे.आईवडील,सगेसोयरे, नातेवाईक, आजूबाजूला घडणाऱ्या गोष्टी यांचंदेखील त्याला भान राहिलेले नाही." ९

आजच्या तरूण पिढीचे एक नवे आभासी विश्वनिर्माण झालेले आहे. सामाजिक, सांस्कृतिक कार्यक्रमातही, मित्रमंडळी

यांच्यासोबत केवळ शरीराने उपस्थित असतात. त्यांच्यात वैचारिक व भावनिक देवाणघेवाण होण्यापेक्षा ते आपल्याला मोबाईल घेऊन समाजमाध्यमात गुंतून पडतात. व्हाट्सॲपवरील मित्रांशी त्यांच्या गप्पा सुरू असतात. जे जवळ आहेत, त्यांचे महत्व त्यांना वाटत नाही आणि जे दूर आहेत त्यांच्याशी चॅटींग करण्यात त्यांना आनंद वाटतो, असं का होतं? तर असंही असत की प्रत्यक्ष भेटीत किंवा चारचौघात प्रत्येक जण आपला 'इगो' राखून आपले वर्चस्व समोरच्यासमोर प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करतो. त्यामुळे प्रत्यक्ष भेटीत उपद्रव व तणाव वाटतो. त्यापेक्षा अनुपस्थित असलेला दूरचा ऑनलाइन मित्र हा आपल्या भावना राखून प्रतिसाद देत राहतो. त्यामुळे तेथे मनाला शांती व आनंद मिळतो आणि आपल्या माणसांपासून दूर राहून व्यक्ती ही समाजमाध्यमात अडकून राहते.सोबतची माणसे त्याला समजून घेण्यात कमी पडतात,म्हणून तसेही घडते. म्हणजेच माध्यमाचे फायदे तसे तोटेही आहेत. त्याची प्रचिती पुढीलप्रमाणे येते. "सोशल मिडियामुळे सर्व समाज, लोक एकत्र आले. विचारांची आणि संस्कृतीची देवाणघेवाण शक्य झाली. देशातील व्यक्ती जगात कुठल्याही व्यक्तीशी सहज मैत्री करू लागला. मानवी आणि नैसर्गिक समस्यांचे निराकरण होऊ लागले. एका विचारांचे लोक भारावून जाऊन ग्रुप बनवू लागले. मग कृतीसाठीदेखील एकत्र येऊ लागले. राजकीय व्यक्ती, अभिनेते, सामाजिक संस्था असे सर्वजण सोशल मीडियावर कार्यरत झाले. त्यामुळे त्यांची लोकांपर्यत झेप वाढली. आपले मत सर्वदूर पसरवता येऊ लागले. वरील फायदे वरवरचे आहेत जर तुम्ही फक्त सोशल साईट्सचा वापर मनोरंजनासाठी करत असाल, असे मनोरंजन मग वेळखाऊ देखील ठरू शकते. पूर्ण दिवस लोक मोबाईल आणि संगणकावर बसून असतात. त्यामुळे आरोग्य धोक्यात येऊ शकते. डोळ्यांचे विकार, पाठदुखी, डोकेदुखी असे विकार जडू शकतात. सोशल मिडिया जास्त फोफावल्यामुळे चुकीच्या बातम्या आणि अफवा यांचा ऊत येऊ लागला आहे. लहान मुले संस्कारिक न होता मनोरूग्ण होऊ लागली आहेत. लहान वयातच हे माध्यम हाती आल्यामुळे नको तेवढा वापर केला जातो. याचे अनेक दुष्परिणाम होऊ शकतात. सायबर चोरीसारखे गुन्हेगार तयार होण्यासाठी हे एक माध्यम / कारण ठरू शकते. हॅकिंगसारख्या घटनांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत असून यामुळे पैसे मिळवण्याचे अनेक गैरमार्ग मुलांना समजू लागले आहेत, जे योग्य नाही. अभ्यास करताना सोशल मीडिया साइट्स चेक करत राहण्यामुळे एकाग्रता भंग पावते, परिणामी, अभ्यासातील लक्ष कमी कमी होत जाताना दिसते. दुसऱ्यांच्या ग्लॅमरस पोस्ट आणि फोटोज पाहून आपल्यालाही ते सुख मिळायला हवं, असं त्यांना वाटू लागतं. मात्र यासाठी कोणत्याही प्रकारची मेहनत करण्याची त्यांची तयारी नसते. कोणतीही गोष्ट चटकन आणि सहजासहजी घडावी असे अनेकांना वाटू लागले. सोशल मीडिया एखाद्या दुधारी तलवारीसारखे आहे."१०

अर्थातच समाजमाध्यम हे माणसामाणसांतील संपर्क घडवून आणण्याचे एक माध्यम आहे. ते चांगले की वाईट याविषयीचा निर्णय घेताना त्याला दोष देत येणार नाही. आपल्य हाती आलेले हे माध्यम व त्याची साधने याचा वापर स्त्री पुरूष जसे करतील, तसे निकाल त्यांना मिळणार म्हणून या माध्यमाचा कोणता परिणाम आपण होऊ द्यावा, हा प्रश्न शेवटी व्यक्तीच्या मनावर आहे.

ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

*Volume–XII, Issue– VI (Special Issue-I)* *Nov – Dec, 2023*

OPEN ACCESS Original Research Article

**निष्कर्ष:**

१ . सामाजमाध्यमांचा समाज विशेषत: स्त्रीपुरुष जीवनावर अनुकूल व प्रतिकूल असा परिणाम झालेला आहे.

२ . स्त्रियांना समाजमाध्यमांच्या वापराचे अधिक धोके दिसून येतात .

३. समाज मध्यमांमुळे आजकालचे तरुण तरुणी वास्तविकता न पाहता काल्पनिक विश्वात अधिक रमतात,त्यामुळे ते कुटुंब व आजीविकेपासून दुरावतात आणि व त्यांचा व्यक्तिमत्व विकास खुंटतो.

४ . पतीपत्नी बराच वेळ समाजमध्यमात गुरफटल्याने मनाने व भावनेने एकमेकांपासून दुरावतात आणि त्यांच्यात कलह निर्माण होतात.

५ . समाजमाध्यमांच्या अतिरिक्त वापरामुळे तरुण तरुणी एकत्र येतात. त्यांच्यात चोरटे प्रेमसंबंध निर्माण होतात. ते विकोपाला जाताना दिसतात.

६. माध्यम व तंत्रज्ञान यांच्या योग्य वापराने माणसाचे कार्य,व्यवहार गतिमान,सुरळीत व सुरक्षित झालेले दिसून येतात.

**संदर्भ सूची:**

https://www.livehindustan.com/uttar-pradesh/moradabad/story-mobile-is-now-a-big-cause-of-dispute-between-husband-and-wife-.8783436html)

लोकमत न्यूज नेटवर्क , लोकमत ,मुंबई, दिनांक 22 -11-2023,पृ. 1

https://hindi.news.18com/blogs/rakesh-kumar-malviya/friendship-increased-or-decreased-with-social-media-check-on-international-friendship-day-.7066941html

https://www.amarujala.com/photo-gallery/lifestyle/relationship/friendship-day--2023difference-between-social-media-friends-and-real-life-friends-2023-08-06?pageId=5

https//hindi.news18.com/blogs/rakesh-kumar-malviya/friendship-increased-or-decreased-with-social-media-check-on-internationalfriendshipday =7066941.html, दि. 4/11/2023

समाज माध्यमे, https://mr.wikipedia.org/s/5fwe

https://pib.gov.in/PressReleaseIframePage.aspx?PRID=1882153

https://thevidarbhanews.com/?p=7620

https://prahaar.in/social-media-and-youth

***Cite This Article:***

Prof. Unnatti S. Choudhari. (2023). SAMAJIVANAVARIL MADHYAMANCHA VA TANTRADNYANACHA PARINAM. In Aarhat Multidisciplinary International Education Research Journal: Vol. XII (Number VI, pp. 370–376). AMIERJ. https://doi.org/10.5281/zenodo.10540605